२११ / ५१२

# महाराष्ट्र शासन
# प्रवेश नियामक प्राधिकरण

९वा मजला, न्यु. एक्सेलसियर बिल्डींग,
ए.के. नायक मार्ग, फोर्ट,
मुंबई - ४०० ००१.

दुरध्वनी : ०२२ - २२०७ ३७१९ / २८
वेबसाईट : http://www.maha-ara.org
ईमेल : ara@maha-ara.org

क्रमांक : बैठक-१८२३/प्र.क्र. २६१/बैठक/३१ ऑगस्ट/२०२३/४१६५ दिनांक : 06 SEP 2023

**बैठकीचे इतिवृत्त**

**मा. श्री. जे.पी. डांगे (भा.प्र.से.), माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य तथा अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण** यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवार, दिनांक ३१ ऑगस्ट, २०२३ रोजी दुपारी १२:०० वा. झालेल्या प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या क्रमांक **७२व्या** बैठकीचे इतिवृत्त,-

प्राधिकरणाचे सदस्य डॉ. राजेंद्र शिवाजी बंगाळ, कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक (दूरदृष्यप्रणालीद्वारे), श्री. रावसाहेब भागडे, (भा.प्र.से.), सदस्य सचिव तथा महासंचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे (दूरदृष्यप्रणालीद्वारे) व श्री. महेन्द्र ब. वारभुवन (भा.प्र.से.), सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य हे बैठकीस उपस्थित होते.

तसेच प्राधिकरणाचे सदस्य १) डॉ. विलास जी. गायकर, माजी कुलगुरु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, रायगड, २) प्रा.डॉ. दिलीप गोविंदराव म्हैसेकर, माजी कुलगुरु, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक, ३) डॉ. वि.म. मोहितकर, संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई व ४) डॉ. शैलेंद्र देवळाणकर, संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, म.रा.यांनी बैठकीच्या अनुपस्थितीबाबत नियमाप्रमाणे रजेचा अर्ज दिलेला नाही त्यानुसार त्यांना अनुपस्थित घोषित करण्यात आले.

तसेच डॉ. गोविंद रे. संगवई, प्र. उपसंचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई हे संबंधित संचालकांच्या वतीने प्राधिकरणाच्या बैठकीस उपस्थित होते.

प्राधिकरणाच्या उक्त बैठकीचे इतिवृत्त पुढीलप्रमाणे आहे,-

**विषय क्रमांक १: प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक ३१/०७/२०२३ रोजी झालेल्या क्रमांक ७१व्या बैठकीचे इतिवृत्त मंजुर करण्याबाबत.**

मा. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक ३१/०७/२०२३ रोजी झालेल्या क्रमांक ७२व्या बैठकीचे इतिवृत्त मंजुर करण्यात आले. सर्व संबंधितांनी याबाबत नोंद घेण्यात यावी.

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

१) तथापि दिनांक २८/०३/२०२३ व २७/०४/२०२३ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्र. १ मधील *प्रपत्र-अ* मधील प्रथम वर्ष व्यावसायिक पदवी वैद्यकीय व दंत अभ्यासक्रमांच्या खालील महाविद्यालयातील प्रवेश प्रकरणी खालील प्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे,-

| Sr. No. | Name of the College | No. of admissions are not approved by the Authority | No. of admissions are approved by the Authority |
|---|---|---|---|
| 1. | 01105 : K.J. SOMAIYA MEDICAL COLLEGE, MUMBAI | 06 | 94 |
| 2. | 02104 : SHRI VASANTDADA PATIL DENTAL COLLEGE, MIRAJ, SANGLI | 14 | 26 |
| 3. | 02331 : ADITYA DENTAL COLLEGE, BEED | 29 | 71 |

२) तसेच दिनांक ३१/०७/२०२३ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्र. ४(ड) मधील निर्णयानुसार शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील प्रवेश प्रक्रिया सद्यस्थितीमध्ये सुरु झालेली असून पूर्ण होण्याच्या टप्प्यावर असल्याने सदरील निर्णयाची अंमलबजावणी शैक्षणिक वर्ष २०२३-२४ ऐवजी २०२४-२५ पासून लागू करण्याबाबत आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात येत आहे.

**<u>विषय क्रमांक २: प्राधिकरणाच्या क्रमांक ७१व्या च्या बैठकीतील निर्णयानुसार कार्यवाही अहवाल (Action Taken Report) बैठकीपुढे ठेवणे.</u>**

मा. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक ३१/०७/२०२३ रोजी झालेल्या क्रमांक ७१व्या बैठकीच्या इतिवृत्तांनुसार प्राधिकरण कार्यालयाद्वारे करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल खालील प्रमाणे आहे,-

<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>विषय सूची क्रमांक</th><th>बैठकीतील निर्देश</th><th>करण्यात आलेली कार्यवाही</th></tr>
<tr><td>१.</td><td>१</td><td>प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक ३०/०६/२०२३ रोजी झालेल्या क्रमांक ७१व्या बैठकीचे इतिवृत्त मंजुर करण्याबाबत</td><td>प्राधिकरणाच्या दिनांक ३१/०७/२०२३ रोजी झालेल्या ७१ व्या बैठकीचे इतिवृत्त सर्व संबंधितांना दिनांक २२/०८/२ रोजीच्या पत्राद्वारे कळविण्यात आले आहे.<br><br>अ) तसेच मा. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक २८/०३/२०२३ व २७/०४/२०२३ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्र. १ मधील प्रपत्र-अ मधील प्रथम वर्ष व्यावसायिक पदवी वैद्यकीय व दंत अभ्यासक्रमांच्या खालील महाविद्यालयातील प्रवेश प्रकरणी खालील प्रमाणे सुधारणा करण्याचे प्रस्तावित आहे,-<br>
<table>
<tr><th>Sr. No.</th><th>Name of the College</th><th>No. of admissions are not approved by the Authority</th><th>No. of admissions are approved by the Authority</th></tr>
<tr><td>1.</td><td>01105 : K.J. SOMAIYA MEDICAL COLLEGE, MUMBAI</td><td>06</td><td>94</td></tr>
</table>
</td></tr>
</table>

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>विषय सूची क्रमांक</th><th>बैठकीतील निर्देश</th><th>करण्यात आलेली कार्यवाही</th></tr>
<tr><td></td><td></td><td></td><td>
<table>
<tr><th>Sr. No.</th><th>Name of the College</th><th>No. of admissions are not approved by the Authority</th><th>No. of admissions are approved by the Authority</th></tr>
<tr><td>2.</td><td>02104 : SHRI VASANTDADA PATIL DENTAL COLLEGE, MIRAJ, SANGLI</td><td>14</td><td>26</td></tr>
<tr><td>3.</td><td>02331 : ADITYA DENTAL COLLEGE, BEED</td><td>29</td><td>71</td></tr>
</table>
वरील प्रमाणे प्राधिकरणाच्या मान्यतेनंतर संबंधित महाविद्यालयांची प्रवेश मान्यते पत्रे निर्गमित करण्यात येतील.
</td></tr>
<tr><td>२.</td><td>४(ड)</td><td>........सांगोपांग चर्चा करण्यात आली व चर्चेअंती अधिनियम २०१५ मधील तरतूदींनुसार १५% टक्के अनिवासी भारतीय कोटयातील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी सोबत जोडलेल्या प्रपत्र-फ नुसार शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले.</td><td>शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील प्रवेश प्रक्रिया सद्यस्थितीमध्ये सुरु झालेली असून पूर्ण होण्याच्या टप्प्यावर असल्याने सदरील निर्णयाची अंमलबजावणी शैक्षणिक वर्ष '२०२३-२४' ऐवजी '२०२४-२५' पासून लागू करण्याचे प्रस्तावित आहे.</td></tr>
<tr><td>३.</td><td>४(क)</td><td>शैक्षणिक वर्ष २०२२-२३ विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्राप्त झालेल्या प्रवेश मान्यता प्रस्तांवावर निर्णय घेण्याबाबत.</td><td>शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील प्रवेश मान्यता पत्रे निर्गमित करण्याची प्रक्रिया सुरु आहे. याबाबतचा अहवाल पुढील बैठकीमध्ये सादर करण्यात येईल.</td></tr>
<tr><td>४.</td><td>४(ख)</td><td>शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पर्यंतच्या व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेशित त्रुटी असलेल्या विद्यार्थ्यांचे प्रवेश खालील संचालनालयांनी सादर केलेल्या पुनःश्च पडताळणी अहवालानुसार मान्यता देण्याबाबत,-</td><td>प्राधिकरणाचे निर्देश संबंधितांना दिनांक २९/०८/२०२३ रोजीच्या पत्रान्वये अवगत करण्यात आले आहेत.</td></tr>
<tr><td>५.</td><td>४(ग)</td><td>शैक्षणिक वर्ष २०१६-१७ व २०२१-२२ मधील विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्राप्त झालेल्या प्रवेश मान्यता प्रस्तांवावर निर्णय घेण्याबाबत.</td><td>प्राधिकरणाचे निर्देश संबंधितांना दिनांक ३१/०८/२०२३ रोजीच्या पत्रान्वये अवगत करण्यात आले आहेत.</td></tr>
<tr><td>६.</td><td>४(घ)</td><td>प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातील कंत्राटी तत्वावरील कार्यरत कर्मचाऱ्यांच्या वेतनवाढीबाबत.</td><td>प्राधिकरणाच्या निर्देशानुसार सीईटी कक्ष व प्राधिकरणाकडून अनुक्रमे दिनांक २९/०८/२०२३ व ३१/०८/२०२३ रोजीचे कार्यालयीन आदेश निर्गमित करण्यात आले आहे.</td></tr>
<tr><td>७.</td><td>४(ङ)</td><td>एम.ई.टी. इन्स्टिटयूट ऑफ इंजिनियरींग, भुजबळ नॉलेज सिटी, नाशिक येथील शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील अभियांत्रिकी अभ्यासक्रमास प्रवेशित कु. वैष्णवी अशोक क्षिरसागर यांच्या प्रवेश मान्यतेबाबत.</td><td>प्राधिकरणाचे निर्देश संबंधितांना दिनांक २५/०८/२०२३ रोजीच्या पत्रान्वये अवगत करण्यात आले आहेत.</td></tr>
</table>

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,

| अ. क्र. | विषय सूची क्रमांक | बैठकीतील निर्देश | करण्यात आलेली कार्यवाही |
|---|---|---|---|
| ८. | ४(च) | मा. उच्च न्यायालयाच्या याचिका क्रमांक १४९२/२०२२ मधील दिनांक ४/०५/२०२३ रोजीच्या न्यायालयीन आदेशान्वये शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील दत्ता मेघे कॉलेज ऑफ नर्सिंग, नागपुर येथील प्रथम वर्ष पदवी व्यावसायिक नर्सिंग अभ्यासक्रमास प्रवेशित कु. आकांक्षा कनोजिया या विद्यार्थीनीच्या प्रवेश मान्यते बाबत. | प्राधिकरणाचे निर्देश संबंधितांना दिनांक २५/०८/२०२३ रोजीच्या पत्रान्वये अवगत करण्यात आले आहेत. |
| ९. | ४(छ) | सिध्दार्थ विधी महाविद्यालय, मुंबई महाविद्यालयातील शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करिता विधी - ३ वर्षे अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते बाबत. | प्राधिकरणाचे निर्देश संबंधितांना दिनांक ३१/०८/२०२३ रोजीच्या पत्रान्वये अवगत करण्यात आले आहेत. |
| १०. | ४(ज) | मा. उच्च न्यायालयाच्या याचिका क्रमांक ५६४/२०२२ मधील दिनांक २४/०४/२०२३ रोजीच्या न्यायालयीन आदेशान्वये अमोलकचंद विधी महाविद्यालय, यवतमाळ येथील शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील विधी - ३ वर्ष अभ्यासक्रमास प्रवेशित कु. भारत रमेश वाघमारे यांच्या प्रवेश मान्यतेबाबत. | प्राधिकरणाचे निर्देश संबंधितांना दिनांक २९/०८/२०२३ रोजीच्या पत्रान्वये अवगत करण्यात आले आहेत. |

सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी प्राधिकरण कार्यालयाद्वारे केलेल्या कार्यवाहीच्या अहवालाची नोंद घेऊन मान्य करण्यात आला.

<u>विषय क्रमांक ३</u>: <u>महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ मधील कलम ९(५)(४) मधील तरतूदींनुसार शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या केद्रींभूत प्रवेश प्रक्रिये दरम्यान उद्भवलेल्या तक्रारींचा व तद्नुषंगाने घेतलेल्या निर्णयाचा आढावा.</u>

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाद्वारे शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया सुरु झालेल्या आहेत. या संदर्भात अधिनियम २०१५ मधील तरतूदींनुसार सदरील प्रक्रिये दरम्यान हितसंबंधित घटकांकडून प्राप्त झालेल्या तक्रारी व तद्नुषंगाने केलेल्या कार्यवाहीचा तपशील आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी प्राधिकरणास अवगत केला <u>(प्रपत्र-अ)</u>. याबाबत सीईटी कक्षातील सर्व संबंधित परीक्षा समन्वयक / सहा. परिक्षा समन्वयक यांनी अभ्यासक्रम-निहाय आढावा सादर केला व त्यानुसार सांगोपांग चर्चा करण्यात आली. प्रस्तूत प्रकरणी सीईटी कक्षाने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली, याबाबतचा तपशील खालील प्रमाणे आहे,-

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

| अ. क्र. | विभाग | एकुण तक्रारी | संबंधित परिक्षा समन्वयक / सहा. परिक्षा समन्वयक |
|---|---|---|---|
| १. | तंत्र शिक्षण | ८७ | श्री. आर. एल. लोढे. |
| २. | उच्च शिक्षण | ०९ | डॉ. जी.टी. केदार व श्री. जे.एम. पाटील. |
| ३. | वैद्यकीय / आयुष शिक्षण | ११७ | श्री. सिध्देश नर. |
| ४. | कृषि शिक्षण | ३६१ | डॉ. एम.बी. निकम. |
| ५. | कला शिक्षण | ०० | डॉ. वि.गो. सकपाळ व श्री. कुमावत |
| | एकुण | ५७४ | |

वरील तक्रारींवर परिक्षा समन्वयक / सहा. परिक्षा समन्वयक यांनी केलेल्या कार्यवाहीबाबत सविस्तर सादरीकरण करुन त्यावर सांगोपांग चर्चा झाली. तसेच या संदर्भात असे निर्दशनास आले की, वरील तालिकेतील तंत्रशिक्षण विभागांतर्गत काही अभ्यासक्रम, उच्च शिक्षण, कला व वैद्यकीय आणि आयुष शिक्षण यांची प्रवेश प्रक्रिया अद्यापही सुरु असल्याने प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर परिपूर्ण अहवाल संबंधितांनी सादर करावा, असे निर्देश देण्यात आले. परंतू सद्यस्थितीत सुरु असलेल्या कार्यवाहीबाबत परिक्षा समन्वयकांच्या कामाबाबत समाधान व्यक्त केले.

तसेच कृषी शिक्षण विभागाची प्रवेश प्रक्रिया पुर्ण झालेल्या असल्याचे निर्दशनास आले, या अभ्यासक्रमांच्या तक्रारीं/निवेदनांची संख्या पाहता डॉ. एम.बी. निकम, परिक्षा समन्वयक, कृषी विभाग यांनी सदरील प्रक्रियेमध्ये त्यांचे निराकरण करुन प्रवेश प्रक्रिया सुरळीतपणे पार पाडली, या त्यांनी केलेल्या उत्कृष्ट कामगीरीची प्राधिकरण नोंद घेत आहे.

गतवर्षीच्या तुलनेत यावर्षीची सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत घेण्यात आलेल्या प्रवेश परिक्षा व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया या वेळेत पूर्ण होण्यास तसेच पारदर्शक व सुरळीतपणे पार पाडण्याच्या कामात राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाचे आयुक्त व सक्षम प्राधिकारी श्री. महेन्द्र ब. वारभुवन यांनी त्यांच्या कामाप्रती दिलेल्या योगदानाची व केलेल्या अतिउत्कृष्ट कामाबाबत प्राधिकरणाने बैठकीमध्ये नोंद घेतली.

तसेच या विषयासंदर्भात संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांनी पुढील बैठकीमध्ये उपस्थित राहण्याबाबतचे निर्देश देण्यात आले.

<u>विषय क्रमांक ४:</u> <u>मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण, म.रा. यांच्या परवानगीने आयत्यावेळच्या विषयांवर चर्चा करणे व निर्णय घेणे.</u>

(क) <u>शैक्षणिक वर्ष २०२१-२२ व २०२२-२३ विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्राप्त झालेल्या प्रवेश मान्यता प्रस्तांवावर निर्णय घेण्याबाबत.</u>

अधिनियम २०१५ मधील तरतदूींच्या अनुषंगाने संबंधित संचालकांनी सादर केलेल्या अहवालानुसार शैक्षणिक वर्ष २०२१-२२ व २०२२-२३ मधील व्यावसायिक पदवी / पदव्युत्तर आयुष शिक्षण, तंत्र शिक्षण,

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

उच्च शिक्षण व वैद्यकीय शिक्षण अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी महाविद्यालयांकडून प्राप्त झालेल्या प्रवेश मान्यता प्रस्तावांचे अवलोकन करण्यात आले व या संदर्भात प्राधिकरणाने खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आले,-

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील आयुष अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांपैकी १) PWD, २) DEFENCE, ३) MKB, ४) ORPHAN व ५) अनिवासी भारतीय (एनआरआय) संवर्गातून व संस्था स्तरावर महाविद्यालयांनी केलेली प्रवेश प्रक्रिया इ. प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रकरणी सदरील प्रवेशाचा दावा सिद्ध करण्याकरिता आवश्यक / विहित केलेल्या व त्यानुसार सादर केलेल्या संबंधीत कागदपत्रांची तपासणी करण्याप्रकरणी प्राधिकरणाच्या दिनांक २८/०३/२०२३ रोजीच्या बैठकीतील निर्णयान्वये गठित करण्यात आलेल्या उपसमितीने तपासणी/छाननीची कार्यवाही करावी. या प्रक्रियेमध्ये उपसमितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर निर्णयाकरिता प्राधिकरणापुढे ठेवावे.

२) प्रस्तूत प्रकरणी संबंधित संचालकांनी शैक्षणिक वर्ष २०२१-२२ व २०२२-२३ मधील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी सादर केलेल्या अहवालानुसार ज्या प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रकरणी त्रुटी नाहीत, १% प्राधिकरण स्तरावरील उपसमितीच्या पडताळणी अहवालानुसार त्रुटी नाहीत तसेच प्राधिकरणाने विहित कलेल्या "प्रक्रिया शुल्काचा" भरणा केलेला आहे. अशा महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशांना प्रवेश नियामक प्राधिकरणाची मान्यता देण्याचा निर्णय घेण्यात आला, तथापि या प्रकरणी 'प्रवेश मान्यता प्रस्ताव' सादर करण्याबाबत महाविद्यालयांकडून झालेल्या दिरंगाई/निष्काळजीपणा बाबत शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील महाविद्यालयांना प्रत्येकी रु. २ लाख व शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील महाविद्यालयांना प्रत्येकी रु. १ लाख दंड आकारण्यात येत आहे. सदरील संचालनालय/अभ्यासक्रम-निहाय (प्रपत्र-ब/महाविद्यालय-निहाय) प्रवेश मान्य करण्यात येत आहे.

तसेच सदरील दंडाची रक्कम संबंधित विद्यार्थी/पालक यांच्याकडून वसूल करण्यात येणार नसल्याचे शपथपत्र व दंडाची रक्कम सादर केल्यानंतर संबंधित महाविद्यालयांना प्रवेश मान्यता पत्रे निर्गमित करण्यात येतील. याबाबत सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी. याबाबतचा गोषवारा खालील प्रमाणे आहे,-

| अ. क्र. | अभ्यासक्रम | एकुण महाविद्यालये |
|---|---|---|
| | शैक्षणिक वर्ष २०२२-२३ | |
| १. | B. PHARMACY | ०२ |
| २. | DSP (DIRECT SECOND YEAR DEGREE PHARMACY) | ०३ |
| ३. | M.P.ED. | ०१ |
| ४. | B.ED. | ०६ |
| ५. | B.P.ED. | ०१ |
| ६. | BAMS | ०३ |
| ७. | PGA | ०१ |
| | एकुण : | १७ |

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

| अ. क्र. | अभ्यासक्रम | एकुण महाविद्यालये |
|---|---|---|
| | शैक्षणिक वर्ष २०२१-२२ | |
| ८. | B.PHARMACY | ०२ |
| ९. | B. ARCHITECTURE | ०१ |
| १०. | DSP (DIRECT SECOND YEAR DEGREE PHARMACY) | ०२ |
| #११. | B.O.TH. | ०१ |
| | एकुण : | ०६ |

(टिप : वरील अ.क्र. ११ वरील नमूद महाविद्यालय मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारितीत येत असल्याने वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मुंत्रालय, मुंबई यांचे क्रमांक एमईडी-१०२०/ प्र.क्र.२०/२०/शि-२, दिनांक ९/१२/२०२२ रोजीच्या पत्रास अनुसरुन सदरील महाविद्यालयास दंड क्षमापित करण्यात येत आहे.)

३) ज्या महाविद्यालयांमध्ये प्रवेश संख्या ० (शुन्य) आहे, अशा महाविद्यालयांना प्राधिकरणाचे प्रक्रिया शुल्क आकारणीबाबत संबंधित संचालक यांनी अभिप्राय सादर करावेत व सदर अभिप्रायाच्या अनुषंगाने सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी कार्यवाही करुन अहवाल सादर करण्याबाबत निर्देश देण्यात आले.

४) अधिनियम २०१५ च्या कलम ९(५) च्या तरतूदींनुसार प्रवेश मान्यता प्रस्ताव संचालकांचा प्रवेश पडताळणी अहवाल व प्रक्रिया शुल्कासह सादर केला आहे. संचालनालयाच्या प्रवेश पडताळणी अहवालात व प्राधिकरण स्तरावर निवडक पध्दतीने करण्यात आलेल्या १% प्रवेश पडताळणीमध्ये त्रुटी नसलेल्या प्रवेशांना मान्यता प्रदान करण्यात येत आहे. ज्या प्रवेशांमध्ये त्रुटी आढळलेल्या आहेत असे प्रवेश अमान्य करण्यात येत आहेत. या अमान्य प्रवेशा संदर्भात हितसंबंधीत घटक मा. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक ३१/०८/२०२१ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्रमांक २(झ) मधील निर्णयांच्या अनुषंगाने प्राधिकरणाच्या दिनांक १/१०/२०२१ रोजीच्या परिपत्रकानुसार पुनर्विलोकन याचिका विहित पध्दतीनुसार सादर करु शकतील.

५) प्राधिकरणाच्या उक्त निर्देशानुसार शैक्षणिक वर्ष २०२१-२२ व २०२२-२३ मधील ज्या महाविद्यालयातील प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे **(प्रपत्र-ब)**, अशा महाविद्यालयांना प्राधिकरणाच्या प्रवेश मान्यतेचे पत्र निर्गमित करण्याबाबत मागील वर्षाप्रमाणे (शैक्षणिक वर्ष २०२१-२२ नुसार) कार्यवाही करावी.

६) अधिनियम २०१५ च्या तरतुदीनुसार ज्या महाविद्यालयांनी प्रवेश मान्यता प्रस्ताव विहित कालावधीत प्राधिकरणाकडे मान्यतेसाठी सादर केलेला नाही, अशा महाविद्यालयांना दिनांक ६/०९/२०२३, ८/०९/२०२३ व ९/०९/२०२३ रोजी प्रस्तावांसह उपस्थित राहण्याबाबत दिनांक २४/०८/२०२३ रोजीच्या पत्राने कळविण्यात आले आहे. त्यानुसार पुढील बैठकीत अहवाल सादर करण्याचे निद्रेश देण्यात येत आहेत.

(जे.पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

(ख) **श्री. पंचम खेमराज लॉ. कॉलेज, सावंतवाडी या महाविद्यालयाची शैक्षणिक वर्ष २०१६-१७, २०१७-१८ व २०१९-२० मधील व्यावसायिक विधी - ३ वर्षे या अभ्यासक्रमाचा प्रवेश मान्यतेबाबत**

श्री. पंचम खेमराज लॉ. कॉलेज, सांवतवाडी, सिंधुदूर्ग या महाविद्यालयातील शैक्षणिक वर्ष २०१६-१७, २०१७-१८ व २०१९-२० मधील व्यावसायिक विधी - ३ वर्षे अभ्यासक्रमास प्रवेशित (एकुण ०७) विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी महाविद्यालयाच्या विनंतीनुसार कार्यालयाने सादर केलेल्या दिनांक ४/०८/२०२३ रोजीच्या प्रस्तावाचे अवलोकन करण्यात आले.

प्रस्तूत प्रकरणी महाविद्यालयाने संबंधित विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत असलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने शपथपत्र सादर करण्याबाबतचे निर्देश देण्यात आले. तद्नंतर याबाबत पुढील निर्णय घेण्याबाबत ठरले.

(ग) **शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील व्यावसायिक पदव्युत्तर वैद्यकीय व दंत अभ्यासक्रमांस प्रवेशित प्रवेशित विद्यार्थ्यांची १% निवडक पध्दतीने प्रवेश पडताळणी/छाननी प्रक्रिया तसेच शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पर्यंतच्या प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रकरणी संचालनालयाने दर्शविलेल्या त्रुटींमुळे ना मंजुर असलेल्या प्रवेशांबाबत पुनश्चः तपासणी/पडताळणी प्रक्रियेकरिता झालेल्या खर्चास मान्यता देण्याबाबत.**

विषयांकित प्रकरणी कार्यालयाने सादर केलेल्या टिपणीची अवलोकन करण्यात आले. श्री. तुषार य. शिंदे, कक्ष अधिकारी यांनी शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील व्यावसायिक पदव्युत्तर वैद्यकीय व दंत अभ्यासक्रमांच्या १% निवडक पध्दतीने प्रवेश पडताळणी/छाननी प्रक्रियेकरिता पुणे दौऱ्या दरम्यान प्रत्यक्ष झालेल्या एकुण रु. ३६,८९४/- एवढया खर्चास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात आली. त्यानुसार लेखा / आस्थपना विभागाने प्रतिपूर्तीची आवश्यक कार्यवाही त्वरीत करावी, असे निर्देश देण्यात आले.

(घ) **प्रवेश नियामक प्राधिकरण व सीईटी कक्षातील कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी यांना वॉर-रुम चे मानधन देण्याबाबत.**

प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक १४/०७/२०२३ रोजीच्या कार्यालयीन आदेशास अनुसरुन शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पर्यंतच्या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रकरणी संचालकांनी दर्शविलेल्या त्रुटींमुळे ना मंजुर करण्यात आलेल्या प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रकरणांचा निपटारा करण्याकरिता प्राधिकरण कार्यालयातील अधिकारी / कर्मचारी यांची दिनांक १७/०७/२०२३ ते १६/०८/२०२३ या एक महिन्याच्या कालावधीकरिता दोन पाळी मध्ये कार्यालयातील प्रलंबित कामकाज पूर्ण करण्याकरिता नियुक्ती करण्यात आली होती. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक १४/०७/२०२३ रोजीच्या कार्यालयीन आदेशाच्या अनुषंगाने प्रस्तूत प्रकरणी प्रलंबित कामाचा निपटारा जलद-गतीने करण्याकरिता वेळोवेळी प्राप्त झालेल्या निर्देशानुसार प्राधिकरणातील सर्व संबंधित अधिकारी/कर्मचारी यांनी व्यक्तिशः लक्ष देऊन कामकाज केले असल्याचे सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी प्राधिकरणास अवगत केले.

त्याचप्रमाणे राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातील अधिकारी/कर्मचारी यांच्या वॉर-रुम च्या कामाबाबत अदा करावयाच्या मानधनाबाबत केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करण्यात आले.

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

उक्त बाबी विचारात घेता वरील कामाकरिता यापूर्वी देखील सीईटी कक्षास श्री.भोसले समितीच्या अहवालानुसार मानधन घेण्यात आलेले आहे, त्यानुसार सन २०२३ मध्ये सीईटी कक्षातील वॉर-रुमच्या कामाकरिता संबंधित अधिकारी/कर्मचारी यांना मानधन अदा करण्यास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात आली व त्याच धर्तीवर प्रवेश नियामक प्राधिकरण कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी यांना दिनांक १४/०७/२०२३ रोजीच्या कार्यालयीन आदेशामध्ये नमूद केलेल्या कामाकरिता करण्यात आलेल्या कामाचा आढावा घेऊन मानधन अदा करण्यास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात आली. प्राधिकरणाच्या निर्देशानुसार कार्यवाही करुन याबाबतचा अहवाल प्राधिकरणास सादर करण्याचे निर्देश देण्यात आले.

(ङ) <u>शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पर्यंतच्या व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेशित त्रुटी असलेल्या विद्यार्थ्यांचे प्रवेश खालील संचालनालयांनी सादर केलेल्या पुनःश्च पडताळणी अहवालानुसार मान्यता देण्याबाबत.-</u>

१) उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांचे अभ्यासक्रम-निहाय अहवाल.

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पर्यंतच्या विविध व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशास मा. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या वेळोवेळी झालेल्या बैठकीमध्ये प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. तथापि, ज्या प्रवेश प्रकरणी संबंधित संचालकांनी त्रुटी दर्शविली अशा प्रकरणांना प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात आलेली नाही. या संदर्भात मा. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक २९/०७/२०२२ रोजीच्या बैठकीतील विषय सूची क्रमांक २(ड) अन्वये त्रुटी असलेल्या प्रवेश प्रकरणी सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण यांनी सविस्तर अहवाल प्राधिकरणासमोर मान्यतेसाठी सादर करावा, असे निर्देश होते.

प्रस्तूत प्रकरणी प्राधिकरणाच्या उक्त निर्देशानुसार मा. सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण यांनी ना मंजुर असलेल्या (प्रलंबित प्रकरणी) प्रवेशांबाबत त्वरीत निपटारा होण्याच्या अनुषंगाने प्राधिकरणाच्या दिनांक १७/१०/२०२२ व १५/११/२०२२ रोजीच्या पत्रान्वये शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पर्यंतच्या प्रवेशित ज्या विद्यार्थ्यांच्या प्रवेशांमध्ये त्रुटी आहेत, अशा विद्यार्थ्यांची पुनःश्च प्रवेश पडताळणी/तपासणी करुन अहवाल सादर करण्याबाबत सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांशी संबंधीत संचालकांना निर्देश देण्यात आलेले आहेत. त्यानुसार संबंधित संचालकांनी पुनश्च पडताळणी करुन अहवाल प्राधिकरणास सादर केलेले आहेत.

सविस्तर चर्चेनंतर, उक्त बाबी विचारात घेता शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पर्यंतच्या पदवी / पदव्युत्तर व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी प्राधिकरणाच्या दिनांक २९/०७/२०२२ रोजीच्या बैठकीतील निर्णयाच्या अनुषंगाने संचालकांनी अभ्यासक्रम-निहाय सादर केलेल्या अहवालांचे अवलोकन करण्यात आले,-

याबाबत सांगोपांग चर्चा करुन उक्त नमूद सादर केलेल्या अहवालास अनुसरुन ज्या प्रवेश प्रकरणी संचालनालयांच्या अहवालानुसार / प्रवेश नियमानुसार पात्र आहेत, अशा प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे. <u>(प्रपत्र-क)</u>.

तथापि ज्या प्रकरणी संबंधित संचालनालयांना वारंवार सूचना/निर्देश देऊन देखील स्वयंस्पष्ट अहवाल प्राधिकरणास झालेले नाहीत, ही बाब प्राधिकरणाच्या निर्दशनास आली आहे व प्राधिकरणाने याची नोंद घेतली.

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

सबब प्रस्तूत प्रकरणी सविस्तर चर्चा करण्यात आली व सद्यस्थितीमध्ये प्राप्त असलेल्या वैद्यकीय शिक्षण अभ्यासक्रमांच्या अहवालांच्या अनुषंगाने संचालनालया मार्फत ज्या प्रवेशांबाबत शिफारस करण्यात आलेली आहे अथवा नाही, परंतू संचालनालयांद्वारे सादर झालेल्या अहवालांमध्ये संधिग्दता दिसून येत असल्याने सदरील प्रवेश प्रकरणी स्पष्टता नसल्याचे निर्दशनास येत आहे,

तथापि वरील बाबी विचारात घेता अशा प्रवेशांना प्राधिकरणाची मान्यता नाकारण्यात येत आहे. <u>(प्रपत्र-ड)</u>. असा निर्णय घेण्यात आला. याबाबतचा तपशील खालील प्रमाणे आहे,-

| अ. क्र. | विभाग | संबंधित संचालनालय यांच्या अभिप्रायासाठी प्रलंबित (विद्यार्थी संख्या) | दि.३१/०८/२०२३ रोजीच्या बैठकीत मान्यता प्रदान केलेल्या विद्यार्थ्यांची संख्या (प्रपत्र-क) | मान्यता प्रदान न केलेल्या विद्यार्थ्यांची संख्या |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १. | तंत्र शिक्षण | ४६ (२८५) | ०० | ४६ (२८५) |
| २. | उच्च शिक्षण | ३०६ (३७०८) | ०१ (३१) | ३०५ (३६७७) |
| ३. | वैद्यकीय शिक्षण | ५६ (१०३) | ०० | ५६ (१०३) |
| | एकुण : | ४०८ (४०९६) | ०१ (३१) | ४०७ (४०६५) |

(च) <u>अधिनियम २०१५ मधील तरतूदींनुसार शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करिता विविध व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी प्राधिकरणाचे "प्रक्रिया शुल्क" निश्चित करण्याबाबत</u>

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ मधील कलम १६(३) मधील तरतूदीन्वये प्राधिकरणाचे प्रक्रिया शुल्क वेळोवेळी निश्चित करण्यात आलेले आहे. शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील प्रक्रिया शुल्क निश्चितीबाबत प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक २५/११/२०२२ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्रमांक ४(क) अन्वये खालील प्रमाणे "प्रक्रिया शुल्क" निश्चितीबाबत निर्णय घेण्यात आला आहे,-

अ) केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या कोटयातील विद्यार्थी प्रवेश क्षमतेकरिता प्रति विद्यार्थी रु. १००/- परंतू रु. २०,०००/- पेक्षा कमी नसावे.

ब) अनिवासी भारतीय कोटा (NRI) विद्यार्थी प्रवेशाकरिता प्रति विद्यार्थी रु. ३०००/-

क) व्यवस्थापन कोटा (Management Quota) / संस्थास्तरीय कोटयातील (Institutional Quota) विद्यार्थी प्रवेश क्षमतेकरिता प्रति विद्यार्थी रु. २०००/-

तसेच उक्त निर्णयानुसार खालील प्रमाणे सुत्र प्राधिकरणाच्या निर्णयानुसार निश्चित करण्यात आले आहे,-

| **CAP Quota (Total Seats)** | **Over and above actual admissions of TFWS / EWS / PMSSS / J&K, etc.** | **Total (1+2)** | **Rs. 100 x No. of admissions shown in column No. (3), but not less than Rs. 20,000/-** | **No. Institutionl / Management Quota (Total Seats) x Rs. 2000/-** | **No. of Actual NRI admissions x Rs. 3000/-** | **Total Processing Fees (Column No. 4+5+6=7)** |
|---|---|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) | (7) |
| | | | | | | |

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

उक्त बाबी विचारात घेता मागील शैक्षणिक वर्ष शैक्षणिक वर्ष २०२२-२३ प्रमाणे शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये वरील सुत्रानुसार प्राधिकरणाचे "प्रक्रिया शुल्क" निश्चिती करण्यात येत आहे. त्यानुसार शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील "प्रक्रिया शुल्क" आकारणीबाबत सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांनी उचित कार्यवाही त्वरीत करावी.

(छ) <u>शैक्षणिक वर्ष २०२३-२४ च्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेचे प्राधिकरण व सीईटी कक्षातील अधिकारी / कर्मचारी यांना मानधन अदा करण्याबाबत</u>

शैक्षणिक वर्ष २०२३-२४ च्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेचे प्राधिकरण व सीईटी कक्षातील अधिकारी / कर्मचारी यांना मानधन अदा करण्याबाबत सीईटी कक्षाकडून सादर केलेल्या दिनांक ३०/०८/२०२३ रोजीच्या प्रस्तावास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात आली. प्राधिकरणाच्या निर्देशानुसार संबंधितांना त्वरीत कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले.

(ज) प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या बैठकीमध्ये झालेल्या निर्णयानुसार सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी विषयाची तातडी लक्षात घेता, बैठकीचे इतिवृत्त मंजूरीची वाट न पाहता बैठकीमध्ये झालेल्या ठरावानुसार यापुढे कार्यवाही त्वरीत करण्याबाबत निर्देश देण्यात आले. तसेच बैठकीचे इतिवृत्त निर्गमित झाल्यानंतर प्राधिकरणाच्या बैठकीमध्ये घेण्यात आलेल्या निर्णयानुसार प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातील सर्व संबंधीत विभागानी त्यांच्याशी संबंधीत प्रकरणी आवश्यक ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांच्यामार्फत प्राधिकरणास त्वरीत सादर करावा. या संदर्भात अवर सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण व प्रशासकीय अधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई हे दोन्ही विभागातील संबंधीत विभागांना बैठकीचे इतिवृत्त उपलब्ध करुन देतील, याबाबत कृपया नोंद घ्यावी.

वरीलप्रमाणे विषयनिहाय सांगोपांग चर्चा झाली, शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील विविध व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेची प्रक्रिया करण्याकरिता १) संचालनालय, तंत्र शिक्षण, मुंबई, २) संचालनालय, उच्च शिक्षण, पुणे व ३) आयुष संचालनालय, मुंबई आणि प्राधिकरण कार्यालयातील संबंधित अधिकारी/कर्मचारी यांनी परिपूर्ण माहिती/अहवाल विहित कालावधीमध्ये सादर केलेले आहेत, या त्यांच्या उल्लेखनीय कामाची प्राधिकरण नोंद घेत आहे. बैठकीच्या सरतेशेवटी सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष, मुंबई यांनी उपस्थितांचे आभार मानून सदर बैठक संपन्न झाल्याचे जाहीर केले.

(जे.पी. डांगे) भा.प्र.से.
अध्यक्ष,
प्रवेश नियामक प्राधिकरण तथा
माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य.

दिनांक : 6/9/23